The South Asian Academic Research Chronicle ISSN 2454-1109
A Refereed Interdisciplinary Indexed International Open Access Monthly e-Journal
Vol 11.Issue1 & 2; Jan-Feb 2024

# मराठी संत कवयित्री: व्यक्तित्व आणि कर्तृत्व

**डॉ. संगीता नारायणराव मुंढे**
**शिवाजी महाविद्यालय, हिंगोली.**

**प्रस्तावना**-महाराष्ट्रहेराज्य पुरोगामी म्हणून ओळखले जाते आधुनिक महाराष्ट्राची जी वैचारिक, सामाजिक, सांस्कृतिक जडणघडण झाली. त्यातप्राचीन काळी वेगवेगळ्या संप्रदायानीजे कार्य केले आहे त्याचा वाटा महत्त्वाचा आहे.महाराष्ट्राच्याभूमीलासंतांची भूमी म्हणून ओळखले जाते इथे अनेक संप्रदाय आणि त्यांच्या अनुयायांनी निर्माण केलेलं साहित्य पहायला मिळते. नाथ, महानुभाव, वारकरी, समर्थ, विर-शैव, दत्तइत्यादी संप्रदायातील संतांनी महाराष्ट्रातील वाङ्मयीन,सामाजिक आणि सांस्कृतिक जीवनाचापाया घातला. चक्रधरांनीमहानुभाव पंथाचेप्रवर्तनकेले आणि खऱ्याअर्थाने भक्तिमार्गाचा सामाजिक समतेचा सर्वसामान्यांच्या आत्मोद्धाराचा मार्ग मोकळा करून दिला. भक्तीचे तत्त्वज्ञान सर्वसामान्यांच्या सोप्या भाषेत सांगितले. पंथाचे दरवाजे स्त्री, शुद्राधिकांना मोकळे केले. वर्णव्यवस्था, जातिभेद, स्त्री-पुरुष विषमता, विटाळ, चांडाळ हे सर्व त्यांनी नाकारले. प्रत्यक्ष व्यवहारात आपल्या आचार विचाराने समता प्रस्थापित करून दाखविली हे चक्रधरांचे तेराव्याशतकातील कार्य म्हणजे एकप्रकारे क्रांतीच म्हणावी लागेल.नंतर संतज्ञानेश्वरांनी वारकरीसंप्रदायाचीपायाभरणी केलीआणि तिथून पुढे महाराष्ट्रातसंतांची मांदियाळी तयारझालेलीपाहायला मिळते.महानुभाव आणि संत संप्रदायाने स्त्रियांना आपल्या पंथात सहभागी करून घेतल्यामुळे याकाळातस्त्रियांनीहीआपलेआध्यात्मिक अनुभव व्यक्त केले आहेत. त्यातमहदंबा,कमलाइसा, उमाइसायामहानुभाव संप्रदायातीलस्त्रिया, मुक्ताबाई, जनाबाई, सोयराबाई, कान्होपात्रा, बहिणाबाई, वेणाबाई, बयाबाई इत्यादी संत कवयित्रींचेकार्य मोलाचे आहे.

**महदंबा**-महदंबाही मराठी भाषेतील आद्य कवयित्री होय.लहानपणीच वैधव्यआलेली महदंबा चक्रधरांची आवडती शिष्या होय. चक्रधर तिच्याबद्दल "म्हातारी जिज्ञासक: म्हातारी चर्चक: म्हातारी येथ काही पुसतचि असे:" असे गौरवोद्गार काढतात. यावरून ती बहुश्रुत तर होतीच पण जिज्ञासू वचर्चकही होती हे समजते.'लीळाचरित्र' या ग्रंथातील 'एकांक'महदंबेनेविचारलेल्या प्रश्नातूनच तयार झाला आहे.महदंबा ही हुषार, चाणाक्ष, चतुर तसेच शीघ्र काव्यरचना करणारीव्यक्ती म्हणून पंथात प्रसिद्ध होती. पंथाबद्दल तिला विलक्षण अभिमान होता. ती स्पष्ट वक्ती होती. नागदेवाचार्य तिच्याबद्दल म्हणतात,"म्हातारी धर्मरक्षक: म्हातारी प्रीतिरक्षक:"यावरून तिचेपंथातील स्थान व्यक्त होते.महादंबेचे चरित्र 'गोविंदप्रभू चरित्र','लीळाचरित्र','इतिहास प्रकरण' इत्यादी ग्रंथातून थोडेफार आलेले पाहायला मिळते.

महदंबेच्या नावावर 'धवळे','मातृकी रुक्मिणी स्वयंवर','गर्भकांड ओव्या' व काही आरत्या एवढी रचना प्रसिद्ध आहे.धवळे व मातृकी रुक्मिणी स्वयंवर या तिच्या काव्यामुळेच ती अधिक प्रसिद्ध झालीमराठी आख्यान कवितेचा प्रारंभ हा महदंबेच्या 'धवळ्यांनी' झाला असे म्हणावे लागेल. तिने पहिल्यांदा रुक्मिणी स्वयंवराची कथा धवळ्यातून गायली.'धवळे' म्हणजे लग्नात गावयाचे वर विषयक गीत. महादंबेने हे धवळे एका विशिष्ट प्रसंगी रचले आहेत. गोविंद प्रभूंना एकदा विवाहाची इच्छा झाली

तेव्हा त्यांच्या इच्छेनुसार महादंबेने हे धवळे गायलेले आहेत.'धवळे' म्हणजे शीघ्र कविता म्हणता येईल. उत्कट भक्ती भावनेचा उत्स्फूर्त अविष्कार म्हणजे धवळे असं म्हणता येईल. महदंबेनेधवळ्याची रचना दोन भागात केली आहे. पूर्वार्ध आणि उत्तरार्ध. पूर्वार्धात एकूण ८३ ढवळे आहेत तर उत्तरार्धात ६५ धवळे आहेत. ढवळ्याची सुरुवातच महादंबेने आपले गुरु गोविंदप्रभू यांना नमन करून केली आहे

"सर्वेस्वराचे शिरीधरूनिया चरण:
मग धवळी गाइन गोविंदुराणा
जेणेरुक्मिणी हरीएलीतेणें पवाडे केलें अद्भुत"

अशा पद्धतीने धवळ्याची सुरुवात केली आहे. कमीत कमी शब्दांत जास्तीत जास्त आशयव्यक्तकरणारी शैली आहे. हीविवाहकथागातांना अनेक घटना- प्रसंगातूनतीगायली आहे. भीमक राजाला रुक्मिणीच्या विवाहाची लागलेली चिंता, श्रीकृष्णाचे वर्णन, रुक्मिणीच्या मनातील श्रीकृष्णाविषयीची प्रीती, शिशुपाला सोबत रुक्मिणीचाठरविलेला विवाह, रुक्मिणीने केलेला श्रीकृष्णाचा धावा, सुदेवब्राह्मणाचेआगमन श्रीकृष्णाचे आगमन आणि रुक्मिणीचे हरण, युद्धइ. प्रसंगातून हीकथापुढे जाते. कथेतील प्रसंगचित्रण, व्यक्तिचित्रण अत्यंत जिवंत आणि प्रत्ययकारी असे उतरले आहे. मोजक्या शब्दातून व्यक्ती चित्र व प्रसंग चित्र नजरेसमोर उभे राहतात. मानवी भावनांच्या आविष्काराला अधिक महत्त्व दिले गेले आहे. या काव्यातून महादंबेच्या स्त्री मनाचेही दर्शन घडते. अगदी छोटे छोटे प्रसंग तिने बारकाईने वर्णन केले आहेत.कथेमध्ये अधून मधून विनोदाचीपखरण केली आहे त्यामुळे कथा कुठेही रूक्षकिंवा पाल्हाळीकवाटत नाही.प्रा. सुग्रामपुल्ले महदंबेच्या धवळ्याविषयीम्हणतात, "ही कथा कुठेही कंटाळवाणीवा रूक्ष बनत नाही. साधेपणाच्या अवीट गोडीने, साध्या जिव्हाळ्याने ओतप्रोत भरलेली ही कथा महोदंबेने अत्यंत तन्मयतेने व समरसून गायिली आहे."१

महदंबेने माहिमभटव लक्ष्मीधरभट यांच्या आज्ञेनुसार ११० ओव्यांचे 'मातृकी रुक्मिणी स्वयंवर' हे दीर्घ काव्य लिहिले आहे. दोन्हीचा विषय एकच आहे. मातृकीरूक्मिणी स्वयंवर'हे एक शिस्तबद्ध रचना असलेली पाहायला मिळते. काव्याच्या दृष्टिकोनातून जर विचार केला तर धवळ्यापेक्षा हे सरस असे काव्य आहे. श्रीकृष्णाविषयीची उत्कट असी भक्ती भावना या काव्यात पाहायला मिळते.उत्कटअशी भक्ती भावना, शालिनता, परमेश्वराविषयी अंतरिक तळमळ, प्रासादिकता, भावोत्कटताक इत्यादी गुण महादंबेच्या लेखनात पाहायला मिळतात.

**संतमुक्ताबाई** -सन्याशाचीमुलेम्हणून ज्ञानेश्वरवत्यांच्या भावंडांचाछळझाला. यासर्वगोष्टींचा छोट्या मुक्ताईवर परीणाम झाला. तीलहानपणीचप्रौढ बनली. गुरुपरंपरेने ती नाथ संप्रदायीआहे. तिचेकार्य मात्रवारकरी संप्रदायासाठीआहे. संत ज्ञानेश्वरांनी भागवत धर्माचा पाया घातला. सर्व भावंडानी वारकरी संप्रदायाचा विस्तार महाराष्ट्रात केला. यात मुक्ताबाईचा देखील समावेश आहे. सगळ्यात धाकटी असलेली मुक्ताबाईआध्यात्मिक क्षेत्रातील अनुभवातमात्र मोठी आहे चांगदेवासारख्या हटयोग्याचीतीगुरूआहे. विसोबा खेचर, नामदेवाचीतीगुरू आहे. तिनेलवकरच आपलेजीवन संपविले. तिच्या नावावर थोडीशीच अभंग रचनावपाळणाउपलब्धआहे. तिचेअभंग प्रामुख्याने विठ्ठल भक्ती, नाम महात्म्य, सद्गुरु स्तवन, संत नामदेव व चांगदेवांना केलेला उपदेश, सामान्य जनाना उपदेश,

ज्ञानदेवांना उपदेश, योगानुभव इ. विषयावर आहेत. जेव्हा ज्ञानेश्वरांनी लोकनिंदेमुळे वैतागूनस्वतःला बंद करून घेतलेले असते तेंव्हा मुक्ताबाई आपल्या या भावंडाला आपल्या अवतर कार्याविषयी आठवण करून देते व समजावूनसांगते. तिने गायलेलेहेअभंग 'ताटीचे अभंग'म्हणून प्रसिद्ध आहेत. यातून मुक्ताबाईची समज, तिचा आध्यात्मिक अधिकार, योगक्षेत्रातीलज्ञान याची प्रचिती येते.तीज्ञानेश्वरांना म्हणते,

"कोणी कोणाशी शिकवावे सारासार शोधुनिघ्यावे
. लडिवाळ मुक्ताबाई बीज मुद्दल ठायी ठायी
तुम्ही तरोनि विश्वतारा ताटी उघडा ज्ञानेश्वरा."

अशापद्धतीने मुक्ताबाईज्ञानेश्वरांनाआपल्या अवतारकार्याचीआठवण करून देते. मुक्ताबाईंनी योगानुभव प्रत्यक्ष अनुभवला होता. त्यामुळेच त्याच्या ठिकाणी एक प्रकारचे तेज प्राप्त झाले होते.त्याकोमलतेवढ्याच परखडहीआहेत.संत नामदेवांनात्या 'अखंड जयाला देवाचा शेजार. कारे अहंकार नाही गेला.' असंसुनावते.त्यांच्यारचनेतूनत्यांच्या स्वभावावरप्रकाशपडतो.

**संतजनाबाई**-भागवत संप्रदाय सर्व जाती धर्मातील लोकांना सामावून घेणारा संप्रदाय होता. त्यामुळेच संत नामदेवांच्या संत मेळ्यात अठरापगड जातीतील संत आपल्याला पाहायला मिळतात.त्यातस्त्रिया देखील होत्या. त्यातीलच एक संत कवयित्री म्हणजे जनाबाई. परभणी जिल्हयातील गंगाखेडची जनाबाई वयाच्या सातव्या वर्षी पोरकी होते. आणि संत नामदेवाच्या घरी येते.तिथून पुढचे सगळे आयुष्य जनाबाईचे नामदेवाच्या घरीच जाते. त्यांच्याच परिवाराचा एक भाग बनून ती राहते. नामदेवांच्या सहवासातच तिला विठ्ठलाची, कीर्तनाची गोडी लागते आणि तिथेच ती अभंग रचायला सुरुवात करते. संत नामदेवांच्या भावजींवनाशीतीएकरूप झालेली पाहायला मिळते.'नामयाची दाशी' म्हणून ती स्वतःला घेते. यात तिला धन्यता वाटते.'जनी म्हणे जोड झाली विठोबाची, दासी नामयाची म्हणोनिया' विठ्ठलभक्तीची आवड आपल्यालानामदेवाच्या आश्रयाला राहिले म्हणूनच निर्माण झाली असे तीम्हणते. जनाबाईच्या नावावर जेमतेम ३५० च्या आसपास अभंग आहेत. तसेच 'थालीपाक आख्यान', आणि 'हरिश्चंद्राख्यानही' तिच्या नावावर आहे.

जनाबाईचे अभंग हे प्रामुख्याने आत्मचरित्रात्मक आहेत. स्वतःच्या जीवनात आलेले अनुभव तिने अभंगाच्या माध्यमातून व्यक्त केले आहेत. तिचे हे बोलणे अंतप्रेरणेतून आलेले आहे. साध्या, सरळ शब्दात आपले भाव ती व्यक्त करते. तिच्या अभिव्यक्तीमध्ये अनोपचारिकता, आत्मनिष्ठा, कौटुंबिक जिव्हाळा, प्रांजळपणा पहायला मिळतो. कवित्वाची जाणीव नसलेल्या एखाद्या सामान्य स्त्रीचे हे आत्मोद्गारआहेत. प्रा. सुग्राम पुल्ले त्यांच्या अभंगाविषयी म्हणतात, "विठ्ठलाच्या भक्तीत रत झालेले निरागस, निष्कपट असे मन तिच्या अभंगवाणीतून व्यक्त होते. अत्यंत समजस व लोभस असे जनाबाईचे व्यक्तित्व, स्त्रीजीवनाच्या व्यथा- वेदना घेऊन अभंगवाणीतून व्यक्त होते. आत्मोद्धाराबाबत कधीही न वाटलेला आत्मविश्वास तिच्या अभंग वाणीतून व्यक्त होतो."३. जनाबाईचे अभंग संख्येने थोडे असले तरीही अतिशय गोड आहेत. एका स्त्री मनाची ती सहज अशी अभिव्यक्ती आहे.तिचे मन सतत पांडुरंगाचा धावा करते. विठ्ठलाशी ती मनानेएकरूप झाली आहे. त्यामुळे विठ्ठल आपल्याला

कामात मदत करतो असं ती म्हणते. तिचा सखा पांडुरंग आहे. तिचे मायबाप सर्वकाही हा पांडुरंगच आहे. 'झाडलोट करी जनी, केरभरी चक्रपाणि' असेतीम्हणते. दररोजच्या कामातून तिचं मन रमवणार हा विठ्ठलच आहे. त्यामुळे ती त्याच्याशी एकरूप होते. त्यालाच भांडते आपल्या अंतरीचे दुःख त्यालाच सांगते.विठ्ठलाशी तिचा अखंड संवाद चालत असतो.सर्व संतांच्या भावजींवनामध्ये विठ्ठलाचे असणारे स्थान जनाबाईला माहिती आहे. त्यामुळे विठ्ठलाकडे पाहण्याची तिची दृष्टी ही तिच्या अभंगातून व्यक्त होते. लेकुरवाळ्या विठ्ठलाचे चित्रंतीने पुढील अभंगातून व्यक्त केले आहे

"विठो माझा लेकुरवाळा संगे गोपाळांचा मेळा
निवृत्ती हा खांद्यावरी सोपानाचा हात धरी
पुढे चाले ज्ञानेश्वर मागे मुक्ताई सुंदर
गोराकुंभार मांडीवरी चोखा जीवा बरोबरी
बंका कडीयेवरीनामा करांगुळी धरी.
. जनी म्हणे गोपाळा करी भक्ताचा सोहळा."

या अभंगातून विठ्ठलाच्या जीवनात असलेले संतांचे, भक्ताचे स्थान आपल्या लक्षात येते. संत सहवासामुळेच जनाबाई देखील बहुश्रुत झालेली आहे नामदेव आणि त्यांच्या संतमेळा यांचा प्रभाव तिच्यावर पडलेला आपल्याला पाहायला मिळतो. त्यामुळे भक्ती विषयक तिची जाण ही प्रगल्भ झालेली आहे. त्यामुळे ती विठ्ठलाला भावाचा भुकेला असल्याची आठवण करून देते.देव आणि भक्त यांचे संबंध हे कसे जिव्हाळ्याचे आहेत. हे आपल्याला जनाबाईच्या अभंगातून पदोपदी पाहायला मिळते. काही अभंगातून आपल्याला पुराणातल्या कथांचे, भक्तांचे, चरित्राचे, द्रौपदी सीता, यांचे संदर्भ आलेले पाहायला मिळतात. त्यातून आपल्याला जनाबाईची बहुश्रुततालक्षात येते तिचे चरित्र आपल्याला तिच्याच अभंगातून उलगडतजाते. स्त्री सहवासातून व्यक्त झालेला हळुवारपणा,आर्तता, उत्कटता, ईश्वर भेटीची तळमळ हे सगळे जनाबाईच्या अभंगातून व्यक्त होते.

**संतकान्होपात्रा** -मंगळवेढा येथील श्यामा नावाच्या एका गणिकेची मुलगी म्हणजे कान्होपात्रा. ही वारकरी संप्रदायातील एक उल्लेखनीय कवयित्री होय. कान्होपात्राच्या नावावर फक्त 23 अभंग पाहायला मिळतात.पण या अभंगातून आलेली जी अर्थता आहे ती आपल्या मनाला जाऊन भिडते. तिच्या अभंगातील करून भाव, उत्कटता, तिची मानसिक घालमेल ही अभंगातून व्यक्त झालेली आहे. एका गणिकेची मुलगी ही गणिकाच होणे त्या काळात अभिप्रेत आहे; पण ती हा व्यवसाय नाकारून विठ्ठलाच्या चरणी स्वतःला समर्पित करते.

पंढरपूरचा विठ्ठल सर्वांच्या आशा अपेक्षा पूर्ण करतोदुःखितांचे दुःख हरतो, अडल्या नडल्यांना मदत करतो. हे कान्होपात्रेला माहीत होते.पांडुरंग भक्तीचा भुकेला आहे. भक्ती शिवाय त्याला काहीही प्रिय नाही. हे तिला माहिती होते. म्हणूनच आपल्याला आपल्या यादुःखीजीवनातून जर सुटका पाहिजे असेल तर विठ्ठला शिवाय पर्याय नाही हे तिला उमजले होते. म्हणूनच ती पंढरपूरला जातेस्वतःची यातिहिनता, पांडुरंगाचे दर्शन, संत सहवास, ज्ञानेश्वर मुक्ताई त्यांच्यावर कोसळली संकटं, नाम महात्म इत्यादी विषयावर प्रामुख्याने तिने अभंग लिहिले आहेत.

“मी तो आहे यातिहीन नकळे काही आचरण
मज अधिकार नाही भेटी देई विठाबाई
जीवींचे जीवलगे माझे कृष्णाई कान्हाई
सावळे डोळसे करुणा येऊ दे काही.”

अशा पद्धतीने आपल्या मनातील भावना ती परमेश्वरापुढे व्यक्त करते. त्याच्या भेटीची तळमळ तिच्या हृदयाला लागून राहिलेली आहे. विठ्ठलाला पाहिल्याच्या नंतर तिला झालेला आनंदही तिने अभंगातून व्यक्त केला आहे. कान्होपात्राचे अभंग म्हणजे तिचे आत्मचरित्रच आहे. त्यातून तिच्या मनाचे, भावनांचे दर्शन घडते. भक्तीरसाने आणि कारुण्याने ओतप्रोत भरलेले तिचे अभंग म्हणजेसहज सुंदर असं काव्य आहे.

**संतबहिणाबाई** -संत तुकारामांची शिष्याबहिणाबाई होय. त्यांचे बालपणीच एका प्रोढव्यक्तीशीलग्न लावले जाते. त्यामुळे त्या विरक्त बनतात. पतीकडून त्यांना बराच त्रास सहन करावा लागतो. मुळातच विरक्त स्वभाव संततुकारामांच्या भेटीनंतर त्यांनाच गुरु केलेले आहे एका ब्राह्मण स्त्रीने शूद्र जातीतील व्यक्तीला गुरू करणे हे त्या काळाच्या मानाने क्रांतिकार्य म्हणावे लागेल.यासाठीही त्यांना बराच त्रास सहन करावा लागला. बहिणाबाई बहुश्रुतहोत्या त्यांच्या रचनेवरून त्यांची ही बहुश्रुतता लक्षात येते. त्या काळात रूढ असलेले काव्यरचनेचे ओवी, अभंग, श्लोक, आरती, पाळणा, पदे, स्फुट आणि आख्यानपर दीर्घरचना इ. जवळजवळ सर्वच प्रकारात त्यांनी रचना केली आहे. तरी ओवी आणि अभंग हे जास्ती पाहायला मिळतात. आरत्या, पदे याही त्यांनी लिहिले आहेत. त्यांची काही पदे हिंदीतही आहेत. त्यांच्या सर्व रचनेवर संत तुकारामांच्या रचनेची सावली पडलेली पाहायला मिळते. तुकारामाप्रमाणेच त्यांची विचारसरणी ही स्पष्ट, निर्भीड आणि परखड आहे.

गुरु परंपरा, आत्मचरित्र, मन, भक्ती, अनुताप, निर्याण, तुळशी महात्म्य, ब्रह्मकर्म, भूत, प्रवृत्ती निवृत्तीचे भांडण, आत्मा- काया भांडण, करूणा, पंढरीमहात्म्य, पांडुरंग महात्म्य, नाम महात्म्य इत्यादी विषयावर विपुल अशी अभंग रचना त्यांनी केली आहे.त्यांचा‘संत कृपा झाली इमारत फळा आली.’ हाअभंग खूप प्रसिद्ध आहे. या अभंगावरून बहिणाबाईंचा संत साहित्याचा गाडा अभ्यास लक्षात येतो. संतांचे कार्य -कर्तुत्व नेमकेपणाने त्यांनी अभंगातून वर्णन केले आहेबहिणाबाई ज्या कालखंडात वावरल्या त्या काळातील समाजाचे चित्रही त्यांच्या काव्यातून प्रतिबिंबित झाले आहे बहिणाबाईच्या सर्वच अभंगातून एका प्रौढ, प्रगल्भ, तरीही प्रेमळ, शोषित आणि वत्सल स्त्रीचे दर्शन घडते.

**संत वेणाबाई** -समर्थ रामदासांच्या शिष्या वेणाबाई. यांचा देखील संत कवयित्री मध्ये समावेश करावा लागतो.वेणाबाईना लहानपणापासूनच रामभक्ती व धार्मिक वाङ्मयाची आवड होती. महाभारत, रामायण, भागवत इ. ग्रंथ त्यांना चांगल्या पद्धतीने अवगत होते. साधू संतांच्या ग्रंथाचेही त्यांनी परिशीलन केले होते. एकनाथी भागवत व भावार्थ रामायणाचे त्यानित्य पठण करत असत. त्यांचा हाच गुण ओळखून रामदासांनी आपल्या शिष्य परिवारामध्ये त्यांचा सहभाग करून घेतला. रामदासांच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी धार्मिक वाङ्मयाचा अभ्यास केला. त्यांच्यात कवित्व, वक्तृत्व होते त्या पुराने सांगत. कीर्तनही करीत. भक्तीपर पदेही गात. त्यांनी लिहिलेल्या ग्रंथातून वस्फुट रचनेवरून त्यांचे

याबाबतीतील ज्ञान समजते.त्यांनी रामायणावरच अनेक रचना केल्या. त्यांची सात रामायणे प्रसिद्ध आहेत. स्वतःची आत्मोन्नतीकरीत करीतच सभोवतीच्या परिस्थितीकडे ही त्यांचे लक्ष होते. ती परिस्थितीही त्यांनी आपल्या ग्रंथातून मांडली आहे.वेणाबाईंनी वारकरी व रामदासी काव्यसंपदेत अद्वैत साधल्याचे सुहासिनी इर्लेकर म्हणतात. त्यांचे 'सीतास्वयंवर' हे स्त्रीमनाचे रंग व धर्म घेऊन प्रकटणारे काव्य वैशिष्ट्यपूर्ण असे आहे.

वर विचार केलेल्या स्त्री संता व्यतिरिक्तसंत नामदेवांच्या घरातील गोणाई, राजाई, आऊबाई, लिंबाईतसेच संत सोयराबाई, निर्मलाबाई भागुबाई, प्रेमाबाई, विठाबाई, अक्काबाई,बयाबाई या संत कवयित्रींनी देखील थोडीफार रचना केली आहे. त्यातून आपले जीवनानुभव व्यक्त केले आहेत. मध्ययुगीन कालखंडामध्ये प्रामुख्याने काव्याचे प्रयोजन हे भक्ती मुक्ती हेच होते स्त्रियांना पाहिजे तेवढी मोकळीक नव्हती. त्यामुळे स्त्रियांचे लेखन अत्यल्प असलेले दिसते. तरी देखील संत कवयित्रींनी वेगवेगळ्या संप्रदायाशी संबंधित असूनही आपले जीवनानुभव निर्भीडपणे वेगवेगळ्या काव्यप्रकारातून व्यक्त केले आहेत. त्यांच्या लिखाणाबद्दल प्राचार्य मा. के. यादव म्हणतात, "संत कवयित्रींनी जाता जाता संप्रदायाचे तत्वज्ञानही सांगितले आहे. परंतु ते प्रचारी थाटाचे नाही. तर आराध्य देवतेच्या - मग ते श्रीकृष्ण असो, श्री विठ्ठल असो किंवा श्री प्रभू श्रीराम असो मनःपूर्वक केलेल्या भक्तीतून ते नकळत प्रकट झाले आणि तेही प्रत्येकीच्या व्यक्तिमत्त्वात रंगून आले असल्याने ते वेगवेगळे स्वरूप प्राप्त करून आले आहे."४सर्वच संत कवयित्री या समाजाच्या वेगवेगळ्या थरातून आलेल्या आहेत. त्यामुळे त्यांचे जीवन अनुभवही वेगवेगळे आहेत. स्वतःच्या पंथाच्या भूमिकेनुसारकवयित्रींनी आपले जीवनानुभव व्यक्त केले आहेत.त्यातून त्यांच्या स्वतःच्या जीवनावर तर प्रकाश पडतोचपणत्याचबरोबरमध्ययुगीन कालखंडातील स्त्री जीवन, रूढी, प्रथा, परंपरा , स्त्री म्हणून तिच्यावर असलेलीबंधने, समाजाचा तिच्याकडे बघण्याचा दृष्टिकोनसमजतो. त्याचेहेसाहित्य म्हणजे मराठी साहित्याला दिलेली ही एक अनमोल देणगी म्हणावी लागेल.

**संदर्भ -**

१) प्रा.पुल्लेसुग्राम -महानुभाव आणि वारकरी साहित्य, सूर्यमुद्रा प्रकाशन नांदेड प्र.आ.२०१६पृ.५५
२) प्राचार्य यादव मा. के. मराठी संत कवयित्री, स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे. प्र.आ.२०१२पृ.३३
३) प्रा.पुल्ले सुग्राम -महानुभाव आणि वारकरी साहित्य, सूर्यमुद्रा प्रकाशन नांदेड प्र.आ. २०१६ पृ.११३
४) प्राचार्य यादव मा. के. मराठी संत कवयित्री, स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे. प्र.आ.२०१२ पृ.१७०